e-Paper : KhabadarPudhari.com

दैनिक **खबरदार पुढारी**
वचन निर्भीड पत्रकारितेची

संपादक :- दत्तात्रय खेमनर | व्हॉट्स ॲप नंबर - 9096200275

श्रीरामपुर | • वर्ष ६ | • अंक-७० | • मंगळवार दि.८ सप्टेंबर २०२६ | • मुल्ये ३/- | • पृष्ठे ४ | • MHAMAR/50621 | • पान-१

अमराठी रिक्षा चालकांचा कांदिवलीत 'रस्ता रोको'.... पान २ वर

तरी राज्यातील शाळा वाचतील.... पान ४ वर

संपर्क कार्यालय
खबरदार पुढारी
नियमित अंक मिळण्यासाठी संपर्क साधा
9096200275

# सागर भैया बेग यांना 'दिलासा', जामीन १५ सप्टेंबरपर्यंत कायम

## फिर्यादी प्रतिज्ञापत्राचा न्यायालयाकडून विचार

- तात्पुरता जामीन कायम
- १५ सप्टेंबरला पुढील सुनावणी
- फिर्यादीच्या प्रतिज्ञापत्राचा आधार
- पोलिसांना पुरावे सादर करण्याची मुदत

**जोरदार युक्तिवाद**

- आशुतोष श्रीवास्तव यांचा युक्तिवाद
- कायमस्वरूपी जामीन मिळणार का?
- पोलिसांना पुरावे सादर करण्याची मुदत




■ खबरदार पुढारी
■ श्रीरामपूर | प्रतिनिधी

हिंदू धर्मरक्षक सागर भैया बेग यांच्या तात्पुरत्या जामीन अर्जावर सोमवारी श्रीरामपूर जिल्हा सत्र न्यायालयात दिल्ली उच्च न्यायालयाचे विधीज्ञ आशुतोष श्रीवास्तव यांनी जोरदार युक्तिवाद केला त्यामध्ये सागर बेग यांचा अटकपूर्व जामीन कायम ठेवण्यात आला. सरकारी वकील व पोलिसांच्या तपासकामी व काही पुरावे न्यायालया समोर मांडायचे असल्याने कोर्टाने पुढील तारीख १५ संप्टेंबर ठेवली आहे.

फिर्यादी महिलेने कोर्टामध्ये दिलेले प्रतिज्ञापत्र कोटनि ग्राह्य धरत जामीन कायम ठेवला त्याचबरोबर दिल्ली उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ आशुतोष श्रीवास्तव यांनी आपल्या युक्तीवादामध्ये कोर्टाला सांगितले की, फिर्यादी महिला स्वतः सांगते मी सागर बेग यांचे नाव फिर्यादीत टाकलेलं नाही ही फिर्याद चुकीची व माझा विश्वासघात करून लिहिली आहे त्यामुळे या प्रकरणांमध्ये राजकीय हस्तक्षेप करून पोलिसांवर दबाव टाकून गुन्हा दाखल झाला का..? यावर कोर्टाने सुमो टू ॲक्शन घ्यावी अशी विधिज्ञ श्रीवास्तव यांनी कोर्टाला विनंती केली.

### 'फिर्यादीत सागर बेग यांचे नावच नाही'

सागर बेग यांच्या बाजूने युक्तिवाद करताना विधिज्ञ आशुतोष श्रीवास्तव यांनी प्रकरणातील फिर्यादीच्या कथित भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. फिर्यादी महिलेने स्वतः सागर बेग यांचे नाव आपण फिर्यादीत टाकलेले नसल्याचे सांगितल्याचा दावा त्यांनी न्यायालयात केला.

तसेच आपल्याशी विश्वासघात करून चुकीच्या पद्धतीने फिर्याद लिहून घेण्यात आल्याचेही फिर्यादी महिलेने नमूद केल्याचा युक्तिवाद करण्यात आला. या बाबींचा विचार करता प्रकरणातील सत्यता आणि फिर्याद दाखल होण्याची संपूर्ण प्रक्रिया तपासणे आवश्यक असल्याचे बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

## राजकीय हस्तक्षेपाचा आरोप; न्यायालयाने दखल घ्यावी

### सुनावणीसाठी न्यायालय परिसरात मोठी गर्दी

या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाला आहे का, तसेच पोलिसांवर दबाव टाकून गुन्हा दाखल करण्यात आला आहे का, असा सवालही विधिज्ञ श्रीवास्तव यांनी उपस्थित केला. या संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती तपासण्यासाठी न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी, अशी विनंती त्यांनी केली.

बचाव पक्षाने उपस्थित केलेल्या या मुद्द्यांमुळे पुढील सुनावणीदरम्यान पोलिसांच्या तपासाची दिशा आणि गुन्हा दाखल करण्यामागील परिस्थिती याबाबत न्यायालयाकडून काय भूमिका घेतली जाते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, सरकारी पक्ष आणि पोलिसांच्या वतीने तपासातील काही बाबी तसेच उपलब्ध पुरावे न्यायालयासमोर मांडण्यासाठी वेळ मागण्यात आला. त्यानुसार न्यायालयाने पोलिसांना १५ सप्टेंबरपर्यंत आवश्यक पुरावे सादर करण्याची मुदत दिली आहे. पुढील सुनावणीवेळी पोलिसांकडून कोणते पुरावे न्यायालयासमोर सादर केले जातात आणि त्यावर बचाव पक्षाकडून काय भूमिका मांडली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

### १५ सप्टेंबरच्या सुनावणीकडे लक्ष

- आता १५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्या दिवशी पोलिसांकडून सादर करण्यात येणारे पुरावे, सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि बचाव पक्षाची भूमिका यावर पुढील न्यायालयीन प्रक्रिया ठरण्याची शक्यता आहे.
- सागर बेग यांना कायमस्वरूपी अटकपूर्व जामीन मिळतो का, तसेच पोलिसांच्या तपासाबाबत न्यायालयाकडून काही निर्देश दिले जातात का, हे पुढील सुनावणीनंतर स्पष्ट होणार आहे.



विशेष महाराष्ट्र

## चेन्नई ते शिर्डी १ हजार किलोमीटरचा पायी प्रवास दहा ज्येष्ठ साईभक्त शिर्डीत साईचरणी लीन



खबरदार पुढारी | श्रद्धा, साईदर्शनाची ओढ आणि घेतलेला संकल्प पूर्ण करण्याची जिद्द असेल, तर वयाची मर्यादा भक्तीच्या मार्गात कधीच अडथळा ठरत नाही. याची प्रचिती चेन्नई येथील दहा ज्येष्ठ साईभक्तांनी दिली आहे. वयाच्या या टप्प्यावर तब्बल १ हजार किलोमीटरचा पायी प्रवास अवघ्या ३२ दिवसांत पूर्ण करत या ज्येष्ठ भाविकांनी शिर्डीत प्रवेश केला. साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी संस्थानच्या वतीनं सर्व पदयात्रींचं स्वागत केलं. चेन्नई ते शिर्डी पायी प्रवास तामिळनाडूची राजधानी चेन्नई येथून साईबाबांच्या दर्शनासाठी या दहा ज्येष्ठ भाविकांनी पदयात्रेला सुरुवात केली होती. चेन्नई ते शिर्डी हे सुमारे १ हजार किलोमीटरचं अंतर पार करताना त्यांनी दररोज सरासरी ४५ ते ५० किलोमीटर पायी प्रवास केला. उन्हाचा कडाका असो, मुसळधार पाऊस असो किंवा बदलतं आणि प्रतिकूल हवामान असो, कोणत्याही परिस्थितीची पर्वा न करता त्यांच्या पावलांची वाटचाल शिर्डीच्या दिशेनं सुरूच राहिली. प्रवासात शरीर थकलं, पाय दुखले, रस्त्याचा खडतरपणा जाणवला. मात्र, मनातील साईभक्तीसमोर या अडचणी अगदीच क्षुल्लक ठरल्या, असं ते भाविक सांगतात. ओठांवर अखंड ॐ साई राम'चा जप आणि मनात साईबाबांच्या दर्शनाची आस घेऊन या भाविकांनी दररोजचा प्रवास पूर्ण केला. दिवसभराचा पायी प्रवास संपल्यानंतर विश्रांती घेत दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्या उत्साहानं पदयात्रेला सुरुवात करणं अशी त्यांची दिनचर्या होती. यंदा भक्तिमय परंपरेचं १२ वं वर्ष चेन्नई ते शिर्डी ही पदयात्रा गेल्या ११ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. यंदा या भक्तिमय परंपरेचं १२ वं वर्ष होतं. विशेष म्हणजे, या पदयात्रेत सहभागी होणारे सर्व दहा भाविक हे चेन्नईतील शासनाच्या विविध विभागांमध्ये आणि कार्यालयांमध्ये सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी आहेत. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी साईबाबांच्या भक्तीचा ध्यास कायम ठेवला. दरवर्षी चेन्नईहून शिर्डीपर्यंत पायी येऊन साईबाबांचं दर्शन घेण्याचा संकल्प त्यांनी जपला आहे. वाढते वय, शारीरिक मर्यादा किंवा प्रवासातील अडचणी यापैकी कोणतीही बाब त्यांच्या भक्तीच्या आड आली नाही. खडतर प्रवास पूर्ण साईचरित्रातील 'जया मनी जैसा भाव, तैसा अनुभव'या शिकवणीचा अनुभव संपूर्ण पदयात्रेदरम्यान आल्याचं भाविकांनी सांगितलं. प्रवासातील प्रत्येक अडचणीच्या वेळी साईबाबांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्याची भावना होत होती. त्यामुळंच एवढं मोठं अंतर आणि एवढा खडतर प्रवास पूर्ण करणं शक्य झालं, असं त्यांनी नमूद केलं. चेन्नई ते शिर्डी हा प्रवास केवळ १ हजार किलोमीटरचं अंतर पार करण्याचा नव्हता, तर तो श्रद्धेचा, निष्ठेचा, संयमाचा आणि समर्पणाचा प्रवास होता. साईबाबांच्या चरणी पोहोचण्याची आस मनात ठेवून या ज्येष्ठ भाविकांनी वयालाही जणू मार्ग टाकत भक्तीची वाट धरली आणि ती यशस्वीपणे पूर्ण केली. साईबाबा संस्थानकडून सत्कार दरम्यान, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सर्व पदयात्रींचं संस्थानच्या वतीनं स्वागत केलं. अशीच साई सेवा या भाविकांकडून आगामी काळातही पडत राहो आणि साईबाबांचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी सदैव राहो, अशी प्रार्थना त्यांनी साईबाबांच्या चरणी केली. यावेळी या साईभक्तांचा साईबाबा संस्थानच्या वतीनं शाल व उदी देऊन सत्कार करण्यात आला. अखंड साईनामाचा जप वय वाढलं म्हणून इच्छाशक्ती कमी होत नाही आणि शरीर थकलं म्हणून भक्तीचा मार्ग थांबत नाही, हे या दहा ज्येष्ठ साईभक्तांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलं.

## वैजापूर तालुक्यातील विरगाव पोलिसांची धडक कारवाई

### नौकरीचे आमिष दाखवून धर्मांतरण, फादर सह चार जणांवर गुन्हा दाखल

■ खबरदार पुढारी
■ वैजापूर | प्रतिनिधी

शिक्षकाची नोकरी देण्याचे आमिष दाखवून पाच लाख रुपये घेतल्यानंतर शिक्षकाच्या दोन्ही मुलांचे धर्मांतर करण्यासाठी दबाव आणल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. मुलांचे धर्मांतर करण्यास नकार दिल्याने नोकरीपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप करत एका शिक्षकाने पाच जणांसह संबंधित संस्थेविरोधात वीरगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

- फादर याबाबत पोलीस ठाण्यातून समजलेली माहिती अशी की, फादर आशिष म्हस्के, सुदाम उबाळे (दोघेही रा. माळीघोगरगाव, वैजापूर), फादर जेरॉल्ड रिबेलो (रा. बोरसर, मूळ रा. वसई, मुंबई), संजय रुपेकर (सेंट थॉमस चर्च, सेवन हिल्स, छत्रपती संभाजीनगर) आणि विनोद शेळके (रा. गंगापूर, मूळ रा. संगमनेर) अशी गुन्हा दाखल झालेल्या पाच व्यक्तींची नावे आहेत. धर्मांतरणाचे हे प्रकरण बोरसर येथील शांतीसदन प्राथमिक शाळेशी संबंधित आहे.

## दिल्ली-एनसीआरमध्ये मुसळधार पाऊस

### 15 विमानांचे मार्ग बदलले ; उत्तर प्रदेशात पूरसदृश परिस्थिती

■ खबरदार पुढारी
■ नवी दिल्ली

दिल्ली-एनसीआरच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. खराब हवामानामुळे दिल्ली विमानतळावरून 15 विमानांचे मार्ग बदलण्यात आले. 26 विमाने रद्द करण्यात आली आणि सुमारे 250 विमानांना विलंब झाला. संगम विहार, दुर्गा विहार आणि कनॉट प्लेसमध्ये 3-4 फूट पाणी साचले. घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरले, तसेच वाहने अडकून पडली. दुसरीकडे, उत्तर प्रदेशातील 19 जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. काशीमध्ये गंगेच्या वाढत्या पाण्यामुळे दशाश्वमेध घाटावरील पोलीस चौकी पाण्याखाली गेली. प्रयागराजमधील दारागंज घाटावरील स्मशानभूमी पाण्याखाली गेल्याने रस्त्यावरच अंत्यसंस्कार करावे लागले. मध्य प्रदेशातील जबलपूर, चंबळ आणि नर्मदापुरम विभागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळला. अशोकनगरमध्ये एक तरुण आपल्या दुचाकीसह वाहून गेला. राज्यातील 22 जिल्ह्यांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

छत्तीसगडमधील मुंगेली येथे पायी चालणाऱ्या एका महिलेवर वीज पडून तिचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, बिलासपूरमध्ये शाळेतून घरी परतणारी तीन मुले घोंगा नदीत वाहून गेली. बलरामपूरमध्ये कान्हार नदी ओलांडताना एक तरुण पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला.

■ दिल्लीच्या अशोक नगर मेट्रो स्टेशनवर पाणी साचले

दरम्यान, राष्ट्रीय राजधानी दिल्ली आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पाऊस कोसळला. दिल्ली, नोएडा आणि गाझियाबादसह अनेक भागांमध्ये पाऊस झाला. वाहतुकीवरही परिणाम झाला. गुरुग्राम आणि कनॉट प्लेससह अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे वृत्त आहे. पाऊस इतका मुसळधार होता की दिवसा अंधार पडला. पाऊस सुरू झाल्यानंतर लगेचच नवीन अशोक नगर मेट्रो स्टेशनच्या आसपास पाणी साचले.

## अक्षरांच्या सोहळ्यात रंगला साहित्यिक मेळावा !

### निमंत्रित कवींच्या कवितांनी रंगली साहित्यिक मैफल



■ खबरदार पुढारी
■ पुणे | प्रतिनिधी

अक्षरवर्स पब्लिकेशन, बार्शी यांच्या वतीने आयोजित पुस्तक प्रकाशन व सन्मान सोहळा रविवारी 'पोतदार सभागृह' सदाशिव पेठ, पुणे येथे उत्साहात पार पडला. साहित्यिक वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाला कवी, लेखक, साहित्यप्रेमी तसेच अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात कवयित्री अमृता कराड लिखित 'एकतर्फी इश्कनामा', रोहिणी दीपक आदलिंगे डाके संपादित 'भक्ती' आणि ऋतिक नानासो हंबीर संपादित 'भावनांचा कल्लोळ' या तीन साहित्यकृतींचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. वसुधा वैभव नाईक होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. अक्षरातून उमलतात स्वप्न शब्दातून सजते बरसात मनीची साहित्यप्रेमींच्या मनामनात ज्योत अक्षरवर्सची. या बहारदार ओळींनी त्यांनी सर्वांची मने जिंकली. यावेळी सुप्रसिद्ध कवयित्री चैताली कापसे मोडक यांनी' उथळ लेखनातून मनोरंजन होते पण लेखन असे करावे की मनोबल वाढेल 'हा सल्ला साहित्यिकांना दिला. तसेच ज्येष्ठ साहित्यिक संजय पातुरकर यांनी भावनांचा कल्लोळ या पुस्तकाला प्रस्तावना दिलेली आहे. सौ. संगीता लांबे यांनी आपल्या भाषणात 'शब्दांचे धन सर्वात मोठे धन हे सांगितले' आणि प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांनी सर्व पुस्तक प्रेमींचे स्वागत केले.

- साहित्यिक वाटचालीची तसेच या उपक्रमामागील भूमिका मांडली. नवोदित लेखक-कवींना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या साहित्यकृती वाचकांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी प्रकाशन संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. यावेळी श्रीराम घी, आरती ढोले पाटील, गौरव पुंडे, भालचंद्र खरळकर, वैशाली खाडे, संगम उबाळे, विनय पिंपरकर आणि दत्तात्रय वारडकर, सत्यभामा ताई, तुषार पालखे, योगेश हरणे, गजानन उफाडे व सुधीर कुलकर्णी इत्यादी कवींनी आपल्या कविता उत्तम सादर केल्या. त्यांच्या सादरीकरणीला उत्स्फूर्त दाद मिळाली. निमंत्रित
- कवींच्या दमदार आणि भावस्पर्शी कवितांनी संपूर्ण सोहळा रंगून गेला. पुस्तक प्रकाशनासोबतच विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. लेखक, कवी आणि साहित्यिकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. प्रकाशन, सन्मान आणि काव्यवाचन अशा त्रिवेणी संगमामुळे हा सोहळा साहित्यप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला.

## मराठे जिंकतील किंवा उपोषण करुन मरेन ; जरांगे यांचा शिष्टमंडळास भेटण्यापूर्वी इशारा

■ खबरदार पुढारी
■ छत्रपती संभाजीनगर

मागण्या मान्य केल्या तर ठीक अन्यथा सरकारची मस्ती उतरवू. तीन वर्षापासून नुसते आश्वासन देत आहेत. २८ ऑगस्टपर्यंत सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करावी, सरकारने गैरसमजातून बाहेर यावे. या लढ्यात मराठे जिंकतील किंवा मी उपोषण करुन मरेन, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला आहे. जरांगे म्हणाले , ' तुम्हाला अजून मराठा समाजाकडून अपेक्षित काय आहे. ५८ लाख नोंदी देणे सरकारचं कर्तव्य आहे.आम्ही मराठ्यांना वेड्यात काढतो हा सरकारचा गैरसमज आहे. शिष्टमंडळ आणि सरकारने गैरसमजातून बाहेर पडावे आता आम्ही वेळ देण्याच्या मनस्थितीत नाही. येणारे शिष्टमंडळ काय चर्चा करणार आहे. त्यांना मराठ्यांचा रोष कमी करायचा आहे काय, असेही जरांगे म्हणाले. हाके हे पोळी भाजण्यासाठी नेत्यांच्या दारात फिरतात. ओबीसीना ते मान्य नाही, अशी टीकाही जरांगे यांनी केली. माझे ओबीसी नेत्यांना आव्हान आहे मराठ्यांच्या विरोधात जाऊ नका.मराठ्यांच्या नादाला लागून तुमचं राजकीय करीअर उद्ध्वस्त करू नका.तुम्ही मंत्री आमदार झाल्यानंतर मराठयांच्या विरोधात काम करता. तुम्ही मराठा कुणबीच्या नादाला लागू नका असा इशारा जरांगे यांनी दिला.

२९ ऑगस्टचे आंदोलन अंतरवलीमध्ये केले जाईल पण सरकारने डाव टाकला तर मुंबईत वर्षा आपल्या सगळ्यांची आहे. फडणवीस विरोध करणार नाहीत. त्यांना खोलीत अडचण होत असतील तर स्लॅब वर बसून आंदोलन करू, असेही जरांगे म्हणाले. समाज मला उघडा पडू देणार नाही. जोपर्यंत आंदोलन सुरू आहे तोपर्यंत मराठे येतील, असेही जरांगे म्हणाले.

## संस्थानच्या कर्मचाऱ्यांना अपघात विम्याचा 'आधार'!

**कर्मचाऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक सुरक्षेला प्राधान्य**

■ खबरदार पुढारी
■ शिर्डी | प्रतिनिधी



साईबाबा संस्थानच्या वतीनं कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेला प्राधान्य देत राबविण्यात येत असलेल्या अपघात विमा योजनेचा प्रत्यक्ष लाभकर्मचाऱ्यांना मिळू लागला आहे. साईबाबा हॉस्पिटलमधील कायमस्वरूपी कर्मचारी बाबूराव गणपत राऊत यांना अपघात विम्याच्या दाव्यापोटी ३ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. संकटाच्या काळात संस्थानने घेतलेल्या विमा योजनेमुळे कर्मचाऱ्याला मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. शिर्डी साईबाबा संस्थानमध्ये हजारो कर्मचारी विविध विभागांमध्ये कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी तसेच दैनंदिन जीवनात उद्भवणाऱ्या अपघाती संकटांपासून आर्थिक संरक्षण मिळावे या उद्देशाने संस्थानच्या माध्यमातून इंडिया पोस्ट पेमेंट बँकेकडून जनता अपघात विमा पॉलिसी घेण्यात आली आहे. या पॉलिसी अंतर्गत कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना १० लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या योजनेसाठी कर्मचाऱ्यांना केवळ ५०० रुपये वार्षिक हप्ता भरावा लागतो. साईबाबा हॉस्पिटलमध्ये कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्यरत असले ले बाबूराव गणपत राऊत यांचा २६ जानेवारी २०२६ रोजी केलवड येथील त्यांच्या राहत्या घरी अपघात झाला होता.

## महत्वाचे

### राज्यात वीजचोरांचा सुळसुळाट!

पुणे | वीजचोरीविरोधात महावितरणकडून धडक मोहीमेद्वारे कारवाई करण्यात येत असून, गेल्या चार महिन्यांमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरीचे प्रकार उघडकीस आले आहेत. आतापर्यंत ६ हजार ६२९ वीजचोरांकडून १४ कोटी १२ लाख रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. महावितरणच्या कोकण विभागात वीजचोरीचे सर्वाधिक प्रकार सापडले असून, विभागांतील ७ हजार ४९६ वीज ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात ४ हजार ५९७, नागपूर विभागात ४ हजार ५२१ आणि पुण्यात सर्वांत कमी २ हजार ९८५ वीजचोरीचे प्रकार सापडले आहेत. महावितरणकडून धडक मोहिमेद्वारे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची तपासणी करण्यात येत आहे. एप्रिल महिन्यापासून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोरीचे प्रकार सापडले, तर केवळ जुलै महिन्यातील कारवाईत ११ हजार ०३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. गेल्या चार महिन्यांतील १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून, ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे देयक संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. उर्वरित ३ हजार ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे. तसेच वीजचोरीच्या सर्वच प्रकरणांमध्ये तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कमही आकारण्यात येत असून, ४ हजार १५९ प्रकरणांमध्ये १ कोटी ८५ लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आल्याचेही महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले.

### जगातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक डिजिटल व्यवहार भारतात

पुणे | ‘मोबाइल, इंटरनेट, ब्रॉडबँड आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बळावर भारताने डिजिटल परिवर्तन घडवले आहे. त्याच धर्तीवर भारताने ब्रिक्स सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी तीन पूरक उपक्रम प्रस्तावित केले आहेत, अशी माहिती केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी शुक्रवारी दिली. ‘ब्रिक्स’ २०२६ अंतर्गत सहभागी देशांच्या दूरसंचार मंत्र्यांची बैठक शुक्रवारी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. भारताने ब्रिक्सच्या संचारविषयक बैठकीत डिजिटल कनेक्टिव्हिटी, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ६जी, सायबर सुरक्षा आणि डिजिटल कौशल्यविकास या क्षेत्रांतील आपली भूमिका बैठकीत मांडली. बैठकीनंतर शिंदे यांनी पत्रकारांना बैठकीतील चर्चेबाबत माहिती दिली. शिंदे म्हणाले, भारताने ब्रिक्सच्या माध्यमातून दूरसंचार आणि डिजिटल क्षेत्रातील दृष्टिकोन अधिक ठळकपणे मांडला आहे. डिजिटल परिवर्तन समावेशक, विश्वासार्ह, सुरक्षित, विस्तारक्षम आणि शाश्वत असले पाहिजे, यावर ब्रिक्स देशांनी भर दिला. डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणे, नवोन्मेषाला चालना देणे, डिजिटल क्षमता वाढवणे आणि सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी ब्रिक्स देशांनी पुन्हा कटिबद्धता व्यक्त केली. प्रस्तावित पूरक प्रकल्पांमध्ये दूरसंचार, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, सायबर सुरक्षा, एआय आणि ६जी क्षेत्रांत संयुक्त प्रशिक्षण-तांत्रिक देवाणघेवाण वाढवणे, यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रारूप असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पदासाठी नव्हे, पक्षासाठी काम करा

## कार्यकर्त्यांनी स्वतःहून पुढाकार घ्यावा : डॉ. सुजय विखे पाटील

■ खबरदार पुढारी
■ अहिल्यानगर

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकत्यांनी केवळ पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता जनतेच्या प्रश्नांवर आणि शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतः हुन पुढाकार घेतला पाहिजे. पद मिळिवण्यासाठी नव्हे, तर पक्षासाठी काम करण्याची मानसिकता प्रत्येक कार्यकत्यांन ठेवली पाहिजे, असे आवाहन भाजपा प्रदेशउपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.



भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार अहिल्यानगर येथे आयोजित भाजपा बिल्हा कार्यकारिणी बैठकीत डॉ. विखे पाटील यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेचे उदाहरण देताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, सरकारने एखादी योजना जाहीर केल्यानंतर

पक्षाने दिलेली विविध पदे ही केवळ नावापुरती किंवा प्रतिष्ठेसाठी नसून त्यातून पक्षाचे काम झाले पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका डॉ. विखे पाटील बांनी मांडली. जिल्हा नियोजन समितीसह विविध पदांवर नियुक्त

झालेल्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या कार्यक्रमांना आणि कार्यकारिणीच्या बैठकांना गांभीयनि उपस्थित राहून आपली सक्रियता दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच तालुकाध्यक्ष, मंडळ अध्यक्ष, मोचर्चे पदाधिकारी, सरचिटणीस तसेच बूथस्तरावरील कार्यकर्ते यांचे पक्षासाठीचे योगदान आणि प्रत्यक्ष कामाचे मूल्यमापन झाले पाहिजे.

### कार्यकर्त्यांशी संवाद साधला...

● योजनेचा लाभ नेमक्या कोणत्या शेतकऱ्याला मिळाला, हे त्याच्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही कार्यकर्त्यांनी स्वीकारली पाहिजे. यावेळी त्यांनी आवर्जून शिडी विधानसभा मतदारसंघातील गावागावांमध्ये सोसायटचांच्या माध्यमातून कर्जमाफीच्या लाभार्थ्यांची यादी घेऊन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या छायाचित्रांसह लाभाची रक्कम नमूद असलेली पत्रे तयार करून ती प्रत्येका लाभार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचविण्याचा उपक्र म राबविल्याचे त्यांनी सांगितले, ङ्गएखाद्या शेतकऱ्याला दीड-दोन लाख रुपयांचा लाभ मिळत असेल, तर हा लाभ कोणामुळे मिळाला याची जाणीव त्याला करून देणे आवश्यक आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

● पक्षासाठी वेळ देणाऱ्या आणि स्वतःहून काम करणाच्या कार्यकर्त्यांना पुढे आणण्याची जबाबदारी नेतृत्वाची आहे, असेही त्यांनी सांगितले. भाजपच्या कार्यपद्धतीचा मूलमंत्र 'राष्ट्र प्रथम, पक्ष नंतर आणि मी शेवटी' हा आहे. मात्र व्यक्तिगत स्वार्थाला पक्षापेक्षा प्राधान्य देण्याची प्रवृत्ती वाढणे योग्य नाही. नेत्यांप्रती वैयक्तिक निष्ठा असली तरी सर्वप्रथम निष्ठा भारतीय जनता पक्षाशी असली पाहिजे.

## “फुले दाम्पत्याला ‘भारतरत्न’ मिळावा” : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

■ खबरदार पुढारी
■ पुणे | प्रतिनिधी



‘फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली आहे,’ असे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर उभारण्यात आलेल्या ‘ज्ञानाई ज्ञानशिल्प’ या भित्तीचित्रांचे लोकार्पण पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे उपस्थित होते. या वेळी शिल्पकार नवीन शेगंबर यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. ‘शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा केवळ इतिहास नाही, तर तो महाराष्ट्राचा आत्मा आहे. आपल्या वर्तमानाचा पाया आहे. हा वारसा अजितदादांनी आपल्या कारकिर्दीत जपला. पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभे राहावे, यासाठी दादांनी पाठपुरावा केला आणि विशेष निधी दिला,’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, ‘महिला विज्ञान, प्रशासन, संरक्षण, शेती, अंतराळ या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत, याच्या मुळाशी सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष आहे. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली आहे. नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे स्मारक आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ‘ज्योती-सावित्री’ अभ्यास शाळा उभारण्यात आली आहे.’

# बँकेच्या पदावर बसण्याची इच्छा नाही

## डॉ. सुजय विखे पाटील

■ जनमत न्यूज
■ अहिल्यानगर

जिल्ह्यातील नेत्यामध्ये माझ्या नावावर सहमती होत नसेल आणि वाद होत असतील, तर मला जिल्हा बँकेच्या पदावर बसण्याची कोणतीही इच्छा नाही, असे स्पष्ट करत डॉ. सुजय विखे यांनी जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका मांडली आहे. तसेच या राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगतील तोच अंतिम निर्णय होईल आणि तीच व्यक्ती जिल्हा बँकेत अध्यक्ष होईल. बाकी राहाता, कर्जत-जामखेडसह काँग्रेसच्या नेत्यासह कोणाला काय वाटते याला अर्थ नाही, असे रोखठोक उत्तर डॉ. विखे पाटील यांनी दिली. बॉसने सांगितलं म्हणजे गोष्ट संपली असेही सांगण्यास ते विसरले नाहीत. रविवारी नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी पक्षांतर्गत वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयालाच अंतिम मानणार असल्याचे सांगितले.



● पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. विखे म्हणाले, कुठलीही निवडणूक लागली की माझं नाव येतं, पण मला काही मिळत नाही. गेल्या सहा-सात महिन्यांपासून हेच चाललं आहे. विधानसभा लागली तर सुजय विखे आमदारकीला, विधान परिषद लागली तर सुजय विखे आमदारकीला आणि जिल्हा बँक

● लागली तरी माझंच नाव पुढे येतं. जिल्हा परिषदेत आरक्षण पडलं म्हणून ठीक आहे, नाहीतर तिथेही माझं नाव चालवलं असतं.

जिल्हा बँकेचे महत्त्व अधोरेखित करताना ते पुढे म्हणाले, जिल्हा बँक ही शेतकर्‍यांच्या अस्मितेची आणि जिवाळ्याची संस्था आहे. सहकार क्षेत्रातील लोकांनी ही संस्था चालवणं योग्य राहील, जेणेकरून शेतकर्‍यांना न्याय मिळेल. आज नॅशनल बँका शेतकर्‍यांना सहज कर्ज देत नाहीत, पण अहिल्यानगर जिल्हा बँकेने शेतकर्‍यांना नेहमीच आधार दिला आहे. आपल्या पदाबाबत आणि पक्षाच्या आदेशाबाबत बोलताना ते ठामपणे म्हणाले, या खुर्चीवर तोच बसेल ज्याचे नाव देवेंद्र फडणवीस सांगतील.

## कर्जमाफीविषयी आक्षेपार्ह पोस्ट पेठ इतबारपूरचा तलाठी निलंबित

■ खबरदार पुढारी
■ अमरावती | प्रतिनिधी

राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेविषयी सोशल मीडियावर प्रक्षोभक, नकारात्मक आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवणे पेठ ईतबारपूर (ता. दर्यापूर) येथील तलाठ्चाला चांगलेच महागात पडले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ही बाब गंभीरतेने घेत विश्वनाथ गोंडाणे यांना २१ ऑगस्टला तत्काळ प्रभावाने शासनसेवेतून निलंबित केले आहे.

शासनाविरोधात गैरसमज पसरवल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाल्याने, निष्पक्ष चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी हा धडक निर्णय घेतला. चौकशीदरम्यान तलाठी गोंडाणे यांनी संबंधित मोबाइल क्रमांक (८००७५८४२२५) आपल्या पत्नीचा असून, वैद्यकीय कारणास्तव स्वतः मोबाइलचा वापर बंद केल्याचा बचाव मांडला होता. मात्र, निवासी नायब तहसीलदारांच्या चौकशीत तहसील कार्यालयाशी संबंधित अधिकृत कामांच्या ग्रुपमध्येही याच क्रमांकावरून मेसेज येत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे गोंडाणे यांनी दिलेला खुलासा व संदेश प्रसाराच्या तारखांमधील विसंगतीमुळे त्यांची सत्यता संशयास्पद ठरली. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये निलंबनाची कारवाई केली.

## गॅस, दूध, साखर, आलेही महाग चहाच्या घोटासाठी खिशाला चटका

■ खबरदार पुढारी
■ धामणगाव | प्रतिनिधी

पावसाळा आणि वाफाळत्या चहाचे नाते तसे जुनेच; पण यंदा या नात्याला महागाईचा चटका लागला आहे. गॅस, दूध आणि साखरेच्या वाढलेल्या दरांनंतर आता आल्याच्या दरवाढीनेही चहाचा हिशेब बिघडविला आहे. पावसाळ्यात आल्याचा चहा घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. आल्याचे भाव वाढल्याने टपरीपासून हॉटेलपर्यंत चहाच्या दरावर परिणाम झाला आहे.

चहाच्या एका कपामागे लागणारे दूध, साखर, चहा पावडर, आले, गॅस आणि पाणी या सगळ्या खर्चाचा हिशेब विक्रेत्यांना मांडावा लागत आहे. त्यामुळे पूर्वी सहज म्हणून घेतला जाणारा चहाचा कप आता ग्राहकाच्या खिशाचा विचार करायला लावत आहे. घरात पाहुणे आले तरी चहा घेणार का, या प्रश्नाआधी घरच्या गृहिणीच्या मनात खर्चाचा हिशेब सुरू होत असल्याची मिश्कील चर्चा रंगत असली तरी, आल्याच्या खरेदीवर कोणताही परिणाम झालेला नाही.

■ पावसाळ्यात वाफाळत्या चहाचा आनंद फिका!

पावसाच्या सरी, थंड वारा आणि हातात वाफाळता आल्याचा चहा, हे पावसाळ्याचे हक्काचे समीकरण. मात्र चहाच्या कपामागे खर्च वाढल्याने या आनंदाची चव काहीशी फिकी झाली आहे.

■ काय महागले?

चहाचा दर केवळ चहा पावडरच्या भावावर ठरत नाही. दूध, साखर, गॅस, आले आणि इतर साहित्याच्या किमतीचा एकत्रित परिणाम चहाच्या कपावर होतो. हल्ली या सर्वच साहित्याचे दर चांगलेच वाढले आहेत.

■ टपरीवर ७, तर हॉटेलात १०-१५ रुपयांपर्यंत

अमरावती शहर व परिसरातील चहाच्या विक्रीत टपरीवरील साधा चहा साधारण ७ रुपयांपर्यंत, तर हॉटेल किंवा दर्जानुसार चहासाठी १० ते १५ रुपयांपर्यंत दर आकारला जात आहे.

■ अनेक ठिकाणी कपाचा आकार घटला!

दर वाढविण्यापेक्षा कपाचा आकार कमी करण्याचा मार्गही काही चहाविक्रेत्यांनी स्वीकारला आहे. ग्राहकांच्या नाराजीचा सामना टाळण्यासाठी दर शक्य तितका स्थिर ठेवत कपातील चहाचे प्रमाण कमी केले जात असल्याची चर्चा आहे.

## नगर तालुक्यात तरूणावर जीवघेणा हल्ला एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ खबरदार पुढारी
■ नेवासा

नेवासा येथील गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या जामिनावर सुटकेनंतर जेऊर बायजाबाई (ता. अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या सत्कार कार्यक्रमाला विरोध केल्याच्या कारणावरून एका तरूणावर चौघांनी लोखंडी रॉड, चाकू, फायटर तसेच कठीण वस्तूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना १ सप्टेंबर रोजी रात्री घडली. मयुर मोहन मकासरे (वय ३०, रा. जेऊर बायजाबाई) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांच्यावर आहे. शुभम शरद जाधव, जाँय सुनील वाघमारे, दीपक नानाभाऊ वाघमारे, हर्षद सचिन वाघमारे (सर्व रा. जेऊर बायजाबाई) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. नेवासा रूग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी दिलेल्या जबाबावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

येथील नितीन केंदळे याच्या सत्काराचा कार्यक्रम जेऊर बायजाबाई येथे आयोजित करण्यात आला होता. केंदळे हा जेलमधून जामिनावर सुटल्याचे सांगत, गावात बाहेरील व्यक्तीच्या सत्काराचा कार्यक्रम सार्वजनिक चौकात सत्कार घेऊ नये, असे मयुर मकासरे याने शुभम जाधव याला फोनवरून सांगितल्याच्या रागातून मयुर मकासरे यांच्यावर खूनी हल्ला झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## कमबॅक करण्यात द्रमुक स्पेशालिस्ट

■ खबरदार पुढारी
■ मुंबई | प्रतिनिधी

द्रमुकचे प्रमुख एम.के.स्टॅलिन यांनी शनिवारी पक्षाचे कार्यकर्ते, समर्थकांचा उत्साह वाढवण्यासाठी आक्रमक, जोशपूर्ण शैलीत भूमिका मांडली. राजकीय कमबॅक करण्यात द्रमुक स्पेशालिस्ट आहे, असे म्हणत त्यांनी राजकीय प्रतिस्पर्ध्यांना आणि विशेषत: तमिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांना इशारा दिला. तमिळनाडूत काही महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणूक झाली. त्यामध्ये विजय यांच्या टीव्हीकेची सरशी झाल्याने द्रमुकला सत्ता गमवावी लागली. त्या पराभवाची मरगळ झटकून जनतेपर्यंत पोहचण्यासाठी स्टॅलिन पक्षाला सज्ज करू पाहत आहेत.

त्या उद्देशातून त्यांनी पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत बोलताना राजकीय कमबॅक करण्याचा विश्वास व्यक्त केला. त्यांनी भाषणात पक्षाच्या रचनेत सुधारणा घडवण्याच्या योजनेवर भर दिला.

राजकीय जय-पराजयाच्या पलिकडे द्रमुकचा पाया विस्तारला आहे. विरोधी बाकांवर असतानाही आपला पक्ष जनतेसाठी कार्यरत राहण्यासाठी ओळखला जातो, असे त्यांनी म्हटले. विजय यांच्यावरही त्यांनी जोरदार निशाणा साधला. विधानसभेला चित्रपटाचा सेट समजून विजय डायलॉग मारत असतात. त्यांचे सरकार जनतेसाठी कुठलेही कार्य न करता सत्तेवर आले.

## पार्टी विथ डिफरन्स या विचारावर काम होत असल्याने भाजप हा ग्रेटच पक्ष : सभापती प्रा.राम शिंदे

■ खबरदार पुढारी
■ पुणे | प्रतिनिधी

### एसआयआरचा दुसरा टप्पाही यशस्वी करावा!

अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीही संघटनात्मक ढाच्यावर भक्कमपणे उभी आहे. पक्षाचा डीएनए हा प्रखर विरोधकाचा असला तरी आता सत्ताधारी असा दोन्ही प्रकारचा आहे. पार्टी विथ डिफफरन्स या विद्रारावर काम होत असल्याने भाजप हा ग्रेटच पक्ष आहे. त्यामुळेच गेल्या १७ वर्षांपासून देशात सत्ताधारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या योग्य कामामुळे भाजपला हे चांगले दिवस आले आहेत.



त्यांच्या कार्याचा अभिनंदनचा ठराव मांडून तो सर्वांनी मंजूर करावा, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी करून भविष्यात जिल्हा परिषद, नगरपंचायत, ग्राम पंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. यांचे नियोजन आत्तापासूनच करणे आवश्यक आहे. बोगस मतदार घालवण्यासाठी एसआयआरचा दुसरा टप्पाही यशस्वी करावा, असे आवाहन सभापती शिंदे यांनी केले. भारतीय जनता पार्टीच्या शहर, दक्षिण व उत्तर जिल्हा

सन्मा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन रविवारी नगर शहरात झाले. यावेळी सभापती प्रा. राम शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

# पुण्यात दंगल घडविण्याचा भाजपचा प्रयत्न; काँग्रेसचा आरोप

■ खबरदार पुढारी
■ पुणे | प्रतिनिधी

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गुंज’ या कार्यक्रमाला मिळणारा मोठा प्रतिसाद पाहून भारतीय जनता पक्षाच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच काही तरुणांनी येऊन शुक्रवारी रात्री धुमाकूळ घालण्याचा प्रयत्न केला. हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते नव्हते तर ते भाजपचे कार्यकर्ते होते. राहुल गांधींच्या कार्यक्रमापूर्वी त्यांना गोंधळ घालून कर्फ्यू लवायचा होता. असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप वर केला.

सीओईपी येथील वसतीगृहात अभाविप आणि काँग्रेस कार्यकर्ते यांच्यात शुक्रवारी रात्री बाचाबाची झाली. कोणता घालणारे तरुण दुसरे होते. भाडोत्री लोक होते, नशापाणी करून आले होते. त्यांनी तिथे दंगलसदृश परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना कर्फ्यु लावायचा होता, असा थेट आरोप सपकाळ यांनी केला. जे लोक काल रात्री घटनास्थळी नव्हते त्यांच्यावरच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मध्यरात्रीच्या गोंधळानंतर पोलिसांकडून जी अपेक्षा होती त्यानुसार ते वागले नाहीत, असेही सपकाळ म्हणाले. पोलिसांनी राजकीय कारवाई केली वस्तुनिष्ठ कारवाई केलीच नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी माध्यमांची संवाद साधला. त्यामध्ये ते बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष सकपाळ म्हणाले, रात्री घडलेल्या प्रकाराचे चित्रीकरण झाले आहे. चुकीची कोणतीही घटना घडू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो मात्र दुसऱ्या गटाचा दंगल सदृश्य स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न होता. या घटनेमुळे आम्ही आमचे लक्ष विचलित होऊ देणार नाही. या घटनेचा सर्व स्तरावर पाठपुरावा केला जाईल.

घटनास्थळी काँग्रेसचे लोकसंख्येने जास्त होते आणि भाजपचे कमी. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुरुवातीला संयमाची भूमिका घेतली. मात्र भाजपने मागवलेले भाडोत्री लोक आक्रमक होते. शिवीगाळ करत होते. त्यांनी कायदा हातात घेतला. पण पोलीस खात्याने चोर सोडून संन्यासाला फाशी हे धोरण स्वीकारत काम केल्याचा आरोप सकपाळ यांनी केला.

मुद्रक व प्रकाशक – अमोल राजेंद्र देशमुख यांच्या वतीने प्रकाशित होणारे दैनिक जनप्रवाह वार्ता हे दैनिक श्री गणेश प्रिंटर्स, २१-ब, तळमजला, नवजीवन औद्योगिक वसाहत, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५ येथे छापून, कार्यालय क्र. ३०४, साईकृपा इमारत, स्टेशन रोड, मुलुंड (प.), मुंबई – ४०००८० येथे प्रसिद्ध करण्यात आले. संपादक – अमोल राजेंद्र देशमुख कार्यकारी संपादक – नितीन प्रकाश मोरे पी.आर.बी. कायद्यानुसार छापून आलेल्या मजकुराची जबाबदारी कार्यकारी संपादकांची राहील. न्यायालयीन क्षेत्र – मुंबई. ई-मेल – [janpravah.dainik@example.com](mailto:janpravah.dainik@example.com) जाहिरात विभाग – ९८६७००००००